# रेल्वेच्या संदर्भात माहितीचा अधिकार कसा वापरावा?

<u>शब्दावली</u>

- **केंद्रीय माहिती आयोग**:- माहितीचा अधिकार अधिनियमाच्या कलम २(ख) अन्वये व्याख्या. केंद्रीय माहिती आयोग हे केंद्र सरकारच्या अधीन सार्वजनिक प्राधिकरणांशी संबंधित तक्रारी आणि अपीलांवर कार्यवाही करण्यास सक्षम प्राधिकरण आहे.
- **माहिती**:- कलम २(च) अन्वये कोणत्याही स्वरुपातील कोणतेही साहित्य, ज्यामध्ये अभिलेख, दस्तऐवज, ज्ञापने, ई-मेल, अभिप्राय, सूचना, प्रसिद्धीपत्रके, परिपत्रके, आदेश, रोजवह्या, संविदा, अहवाल, कागदपत्रे, नमुने, प्रतिमाने (मॉडेल), कोणत्याही इलेक्ट्रॉनिक स्वरुपातील आधारसामग्री आणि त्या त्या वेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यांवये सार्वजनिक प्राधिकरणास मिळवता येईल अशी कोणत्याही खाजगी निकायाशी संबंधित माहिती यांचा समावेश होतो.
- **सार्वजनिक प्राधिकरण**:- कलम २(ज) अन्वये याचा अर्थ, --

  क. संविधानाद्वारे किंवा तदन्वये;

  ख. संसदेने तयार केलेल्या कोणत्याही अन्य कायद्याद्वारे;

  ग. राज्य विधानमंडळाने तयार केलेल्या कोणत्याही अन्य कायद्याद्वारे;

  घ. समुचित शासनाने काढलेल्या अधिसूचनेद्वारे किंवा आदेशाद्वारे स्थापन करण्यात आलेले किंवा घटित करण्यात आलेले कोणतेही प्राधिकरण किंवा निकाय किंवा स्वराज्य संस्था, असा आहे आणि त्यामध्ये,

  (एक) समुचित शासनाची मालकी असलेला, त्याचे नियंत्रण असलेला किंवा त्याच्याकडून निधीद्वारे ज्याला प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे मोठ्या प्रमाणात वित्त पुरवठा केला जातो असा निकाय;

  (दोन) समुचित शासनाकडून निधीद्वारे जिला प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे मोठ्या प्रमाणात वित्त पुरवठा केला जातो, अशी आशासकीय संघटना, यांचा समावेश होतो.
- **माहितीचा अधिकार**:- माहितीचा अधिकार याचा अर्थ, कोणत्याही सार्वजनिक प्राधिकरणाकडे असलेली व या अधिनियमान्वये मिळवता येण्याजोगी माहिती मिळवण्याचा अधिकार, असा आहे आणि त्यामध्ये:-

  (एक) एखादे काम, दस्तऐवज, अभिलेख यांची पाहणी करणे;

  (दोन) दस्तऐवजांच्या किंवा अभिलेखांच्या टिपण्या, उतारे किंवा प्रमाणित प्रति घेणे;

  (तीन) सामग्रीचे प्रमाणित नमुने घेणे;

(चार) डिस्केट, फ्लॉपी, टेप, व्हिडीओ कॅसेट या स्वरूपातील किंवा कोणत्याही अन्य इलेक्ट्रॉनिक प्रकारातील माहिती किंवा जेव्हा अशी माहिती संगणकात किंवा अन्य कोणत्याही उपकरणात साठवलेली असेल त्याबाबतीत मुद्रित प्रती (प्रिंटआऊट) मार्फत माहिती मिळवणे; यांबाबतच्या अधिकाराचा समावेश होतो.

- **राज्य माहिती आयोग**:- माहितीचा अधिकार अधिनियमाच्या कलम २(ख) अन्वये व्याख्या. राज्य माहिती आयोग हे राज्य सरकारच्या अधीन सार्वजनिक प्राधिकरणांशी संबंधित तक्रारी आणि अपीलांवर कार्यवाही करण्यास सक्षम प्राधिकरण आहे.

## १. पार्श्वभूमी

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चा उद्देश सार्वजनिक प्राधिकरणांकडून मागवलेली माहिती मिळवून देणे असा आहे. माहितीचा अधिकार अधिनियमाच्या कलम २ (च) अन्वये माहितीची व्याख्या करण्यात आलेली आहे तर कलम २(ज) अन्वये सार्वजनिक प्राधिकरण याची व्याख्या करण्यात आलेली आहे. संबंधित कलमे खाली पुनरुक्त केलेली आहेत:-

***कलम २(च)*:-** *'माहिती' याचा अर्थ कोणत्याही स्वरुपातील कोणतेही साहित्य, ज्यामध्ये अभिलेख, दस्तऐवज, ज्ञापने, ई-मेल, अभिप्राय, सूचना, प्रसिद्धीपत्रके, परिपत्रके, आदेश, रोजवह्या, संविदा, अहवाल, कागदपत्रे, नमुने, प्रतिमाने (मॉडेल), कोणत्याही इलेक्ट्रॉनिक स्वरुपातील आधारसामग्री आणि त्या त्या वेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यांवये सार्वजनिक प्राधिकरणास मिळवता येईल अशी कोणत्याही खाजगी निकायाशी संबंधित माहिती यांचा समावेश होतो.*

**कलम २(ज)**:- *'सार्वजनिक प्राधिकरण' याचा अर्थ, --*

*क. संविधानाद्वारे किंवा तदन्वये;*

*ख. संसदेने तयार केलेल्या कोणत्याही अन्य कायद्याद्वारे;*

*ग. राज्य विधानमंडळाने तयार केलेल्या कोणत्याही अन्य कायद्याद्वारे;*

*घ. समुचित शासनाने काढलेल्या अधिसूचनेद्वारे किंवा आदेशाद्वारे स्थापन करण्यात आलेले किंवा घटित करण्यात आलेले कोणतेही प्राधिकरण किंवा निकाय किंवा स्वराज्य संस्था, असा आहे आणि त्यामध्ये,*

*(एक) समुचित शासनाची मालकी असलेला, त्याचे नियंत्रण असलेला किंवा त्याच्याकडून निधीद्वारे ज्याला प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे मोठ्या प्रमाणात वित्त पुरवठा केला जातो असा निकाय;*

*(दोन) समुचित शासनाकडून निधीद्वारे जिला प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे मोठ्या प्रमाणात वित्त पुरवठा केला जातो, अशी अशासकीय संघटना, यांचा समावेश होतो*

**२. रेल्वेचा समावेश सार्वजनिक प्राधिकरणामध्ये होतो काय?**

भारतीय रेल्वेची स्थापना रेल्वे अधिनियम, १९८९ या भारताच्या संसदेने केलेल्या कायद्यानुसार केलेली आहे. अशा प्रकारे, भारतीय रेल्वे कलम २(ज)(ख) अन्वये सार्वजनिक प्राधिकरणात होतो आणि त्यामुळे त्या खात्यावर माहिती देण्याचे दायित्व आहे. भारतीय रेल्वेच्या अधिकृत वेबसाईटवर नमूद केल्याप्रमाणे माहितीचा अधिकार अधिनियमाच्या **कलम ४(१)(ख)** नुसार माहिती उपलब्ध आहे.

कलम ४(१)(ख) खाली उद्धृत केले आहे:-

*४. (१) प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरण, –*

*(क) या अधिनियमाद्वारे देण्यात आलेला माहितीचा अधिकार मिळणे रॉयचे होईल अशा रीतीने आणि स्वरूपात सर्व अभिलेख युगया रीतीने सूचिबद्ध करील आणि त्याची निर्देशसूची तयात करील आणि ज्याचे संगणकीकरण करणे योग्य आहे, अशा सर्व अभिलेखांचे वाजवी कालावधीत आणि साधनसंपत्तीच्या उपलब्धतेनुसार संगणकीकरण केले जात आहे याची आणि असे अभिलेख पाहावयास मिळणे सोयीचे व्हावे म्हणून संपूर्ण देशातील विविध प्रणालींमध्ये नेटवर्कद्वारे ते जोडले जात आहेत, याची खातरजमा करील.*

*(ख) हा अधिनियम झाल्यापासून एकशेवीस दिवसांच्या आत, –*

*(एक) आपली रचना, कार्ये व कर्तव्ये यांचा तपशील;*

*(दोन) आपले अधिकारी व कर्मचारी यांचे अधिकार व कर्तव्ये;*

*(तीन) निर्णय घेण्याच्या प्रक्रियेत अनुसरण्यात येणारी कार्यपद्धती, तसेच पर्यवेक्षण आणि उत्तरदायित्व प्रणाली;*

*(चार) स्वतःची कार्ये पार पाडण्यासाठी त्यांच्याकडून ठरविण्यात आलेली मानके;*

*(पाच) त्याच्याकडे असलेले किंवा त्याच्या नियंत्रणात असलेले किंवा त्यांची कार्ये पार पाडण्यासाठी त्याच्या कर्मचारीवर्गाकडून वापरण्यात येणारे नियम, विनियम, सूचना, नियमपुस्तिका आणि अभिलेख;*

*(सहा) त्यांच्याकडे असलेल्या किंवा त्याच्या नियंत्रणाखाली असलेल्या दस्तऐवजांच्या प्रवर्गाचे विवरण;*

*(सात) आपले धोरण तयार करण्याच्या किंवा त्याची अंमलबजावणी करण्याच्या संबंधात, लोकांशी विचारविनिमय करण्यासाठी किंवा लोकांकडून निवेदने केली जाण्यासाठी अस्तित्वात असलेल्या कोणत्याही व्यवस्थेचा तपशील;*

*(आठ) आपल्या एक भाग म्हणून किंवा सल्ला देण्याच्या प्रयोजनासाठी म्हणून घटित केलेल्या दोन किंवा अधिक व्यक्तींच्या मिळून बनलेल्या मंडळाच्या, परिषदांच्या, समित्यांच्या आणि अन्य निकायांचे विवरण; आणि त्या मंडळांच्या, परिषदांच्या, समित्यांच्या आणि अन्य निकायांच्या बैठकी लोकांसाठी खुल्या आहेत किंवा कसे किंवा अशा बैठकीची कार्यवृत्ते जनतेला पहावयास मिळण्याजोगी आहेत किंवा कसे याबाबतचे विवरण;*

*(नऊ) आपल्या अधिकाऱ्यांची आणि कर्मचाऱ्यांची निर्देशिका;*

*(दहा) आपल्या प्रत्येक अधिकाऱ्याला व कर्मचाऱ्याला मिळणारे मासिक वेतन; तसेच प्राधिकरणाच्या विनियमांमध्ये तरतूद केल्याप्रमाणे नुकसानभरपाई देण्याची पद्धती;*

*(अकरा) सर्व योजनांचा तपशील, प्रस्तावित खर्च दर्शविणारा, आपल्या प्रत्येक अधिकारणाला नेमून दिलेला अर्थसंकल्प आणि संवितरित केलेल्या रकमांचा अहवाल;*

*(बारा) अर्थसहाय्य कार्यक्रमांच्या अंमलबजावणीची रीत तसेच वाटप केलेल्या रकमा आणि अशा कार्यक्रमांच्या लाभाधिकाऱ्यांचा तपशील;*

*(तेरा) ज्या व्यक्तींना सवलती, परवाने किंवा प्राधिकारपत्रे दिलेली आहेत अशा व्यक्तींचा तपशील;*

*(चौदा) इलेक्ट्रॉनिक स्वरूपात त्यास उपलब्ध असलेल्या किंवा त्याच्याकडे असलेल्या माहितीचा तपशील;*

*(पंधरा) माहिती मिळवण्यासाठी नागरिकांना उपलब्ध असलेल्या सुविधांचा तपशील, तसेच सार्वजनिक वापरासाठी चालविण्यात येत असलेल्या ग्रंथालयाच्या किंवा वाचनालयाच्या कामकाजाच्या वेळांचा तपशील;*

*(सोळा) जन माहिती अधिकाऱ्यांची नावे, पदनामे आणि इतर तपशील;*

*(सतरा) विहित करण्यात येईल अशी इतर माहिती;*

*प्रसिद्ध करील आणि त्यानंतर दरवर्षी ती प्रकाशने अद्ययावत करील;*

खालील कलमानुसार जन माहिती अधिकारी पदनिर्देशित करणे हे भारतीय रेल्वेचे दायित्व आहे:-

*५(१) - प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरण, हा अधिनियम अधिनियमित झाल्यापासून शंभर दिवसांच्या आत, या अधिनियमान्वये माहिती मिळण्याची विनंती करणाऱ्या व्यक्तींना माहिती*

*देण्यासाठी, त्याच्या अखत्यारीतील सर्व प्रशासकीय युनिटांमध्ये किंवा कार्यालयांमध्ये आवश्यक असतील तेवढ्या जास्तीत जास्त अधिकाऱ्यांना, यथास्थिति, केंद्रीय जन माहिती अधिकारी किंवा राज्य जन माहिती अधिकारी म्हणून पदनिर्देशित करील.*

**३. ताज्या मार्गदर्शक सूचना**

रेल्वे मंत्रालयाने सन २०१९ मध्ये माहितीच्या अधिकाराच्या प्रकरणांची वेगवान हाताळणी करण्याच्या संदर्भात मार्गदर्शक सूचना जारी केल्या. त्यांचा गोषवारा पुढे उद्धृत केला आहे:-

*२. हे प्रकरण बोर्डाने (सीआरबी आणि एमटी) पुनर्विलोकित केले आहे. यापुढे पुढील पद्धती साक्षेपीपणे पाळावी असा निर्णय घेण्यात आलेला आहे:-*

*(१) सर्व संचालनालय माहितीच्या अधिकाराच्या सर्व प्रलंबित प्रकरणांवर बारकाईने देखरेख करतील आणि ३० दिवसांच्या निर्धारित कालावधीत त्यांचा वेगाने आणि यथायोग्य निपटारा केला जाईल.*

*(२) नोडल माहिती अधिकार अधिकारी, माहिती अधिकार कक्ष, रेल्वे बोर्ड माहितीच्या अधिकाराच्या प्रलंबित प्रकरणांची केंद्रीय जन माहिती अधिकारीवार मासिक सूची तयार करतील. आवश्यकतेनुसार, ईडीपीजी संबंधित प्रथाप अपिलीय प्राधिकाऱ्यास आणि एएमना तातडीने निपटारा करण्याबाबत टिप्पणी पाठवतील.*

*(३) अशी कार्यवाही करूनही माहिती सामायिक करण्याचे कार्य एखाद्या कार्यालयाकडून या झाल्यास, कसूरदार अधिकारी/ कर्मचाऱ्यांची मासिक आधारावर व्यक्तिगत जबाबदारी निर्धारित करून तसा अहवाल ईडीपीजी यांना सादर केला जाईल.*

*(४) माहितीच्या अधिकाराची सर्व वादग्रस्त प्रकाराने कार्यालयीन आदेश क्र २०१७ चा १५ नुसार (प्रत सोबत जोडली आहे)सोडवली जातील.*

*(५) जेथे माहितीच्या अधिकाराखालील अर्जाचा संबंध एकाहून अधिक जन माहिती अधिकाऱ्यांशी आहे अशा प्रकरणात, कार्यालयीन आदेश क्र २०१० चा २७ नुसार देण्यात आलेल्या सूचनांचे पालन केले जाईल, ज्यानुसार संसदेच्या हाताळणीप्रमाणे पद्धत वापरून हाताळणी करणे अनिवार्य आहे.*

*(६) अंतरणाच्या प्रत्येक प्रकरणामध्ये प्रकरण विशिष्ठ विभागाकडे अनुत्तरित करण्याचे वैध कारण नमूद केले जाईल आणि प्राप्तकर्त्या अधिकाऱ्याच्या सहमतीनेच अंतरण केले जाईल. केवळ "ही बाब या विभागाशी संबंधित नाही' असे कारण स्वीकारले जाणार नाही.*

*(७) अंतरण किंवा सेवावधीच्या संदर्भात माहितीच्या अधिकाराचा प्रभार यथायोग्य सोपवला/ घेतला असल्याबाबत प्रथम अपिलीय प्राधिकारी खबरदारी घेईल.*

*(८) ०१.०४.२०१९ रोजी प्रलंबित असलेल्या सर्व प्रकरणांचा निपटारा ३० दिवसात करावा. आज रोजी सर्व विभागांकडे मिळून ७८८१ प्रकरणे ३० दिवसांतून अधिक काळ प्रलंबित आहेत. अशी प्रकरणे असल्यास प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याने ईडीपीजी यांच्याकडे रेल्वे बोर्डाच्या सचिवांपुढे समग्र परिस्थिती ठेवण्यासाठी प्रकरणवार टिप्पणी सादर करावी.*

**४. मागण्यात येणारी माहिती**

केंद्रीय जन माहिती आयोगाने दिलेल्या माहितीनुसार, खालील सूचीमध्ये नमूद बाबींच्या विषयीची माहिती रेल्वेकडे सर्वाधिक प्रमाणात मागण्यात येते:-

(१) सेवाविषयक बाबी:- नियुक्त्या, सेवा पुस्तके, खात्यांतर्गत परीक्षा, बढत्या, बदल्या, वेतन, वेतन निश्चिती, थकबाकी, गोपनीय अहवाल, सेवानिवृत्तीची प्रकरणे इत्यादी;

(२) निविदांशी संबंधित बाबी:- निविदा आणि ठेके देणे (बांधकाम आणि उघड्या वाहिन्या);

(३) रेल्वे रिक्रुटमेंट बोर्ड (आरआरबी) आणि रेल्वे रिक्रुटमेंट सेल (आरआरसी):- प्राप्त गुण, सीमान्तक गुण (कट ऑफ मार्क्स), उत्तर पत्रिका/ आदर्श उत्तर पत्रिकांच्या प्रती, भरती, रिक्त जागांचे तपशील इत्यादी;

(४) व्यक्तिगत तपशील (तृतीयपक्ष माहिती):- वेतन, मालमत्ता, कौटुंबिक तपशील, कर्मचाऱ्यांचे तपशील, आरोग्यविषयक स्थिती, तृतीयपक्षाचे (कर्मचारी) सेवाविषयक तपशील;

(५) प्रवास विषयक बाबी:- आरक्षण, ई-तिकीट परतावा, प्रवाशांसाठी सोयी-सुविधा इत्यादी;

(६) दावे आणि भरपाईशी संबंधित बाबी:- वस्तू/ पार्सलाच्या अप्राप्तीचे दावे, अपघात आणि दुर्घटनांसाठी नुकसानभरपाई, सानुग्रह अनुदान इत्यादी;

(७) दक्षता पथकाच्या तपासाशी संबंधित बाबी, डीएआर प्रकरणे;

(८) आवेदकांची निवेदने/ पत्रे/ तक्रारी यावर केलेली कार्यवाही;

(९) रेल्वेगाड्यांचे थांबे, मार्ग बदलाशी संबंधित बाबी, रेल्वेगाड्यांचा वक्तशीरपणा;

(१०) सर्वेक्षणे आणि जमीन अधिग्रहणासाठीचा मोबदला/ भरतीशी यासह जमिनीशी संबंधित बाबी इत्यादी

**५. द्वितीय अपील**

भारतीय रेल्वे केंद्र सरकारच्या अखत्यारीत असल्याने, प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाने व्यथित पक्षांना केंद्रीय माहिती आयोगापुढे द्वितीय अपील सादर करावे लागेल.

**६. ताज्या घडामोडी**

(१) केंद्रीय जन माहिती अधिकाऱ्याने *"व्यावसायिक निगम आणि न्यायिक व्यक्ती या अधिनियमाच्या अन्वये माहिती मागू शकत नाहीत. त्यामुळे, एखाद्या व्यक्तीने सार्वजनिक प्राधिकरणाकडे एखाद्या व्यावसायिक निगमाचा/ ची प्रतिनिधी म्हणून माहितीसाठी अर्ज सादर केल्यास, तो/ ती या अधिनियमाखाली माहिती मिळवण्यास पात्र नाही."* असे नमूद करत माहिती नाकारली. परंतु, केंद्रीय माहिती आयोगाने केंद्रीय जन माहिती अधिकाऱ्याचा युक्तिवाद समर्थनीय नाही असे नमूद करत अर्जदाराला माहिती देण्याचे आदेश दिले.
आयोगाने अनेक निकालांमध्ये असे ग्राह्य धरले आहे की माहितीच्या अधिकाराखालील सदर अर्जावर भारताचा नागरिक असलेल्या व्यक्तीने सही केलेली असल्याने, असा अर्ज कोणत्याही क्षमतेखाली सादर केलेला असला तरी वैध आहे.

(२) नुकतेच, ऑक्टोबर २०२१ मध्ये, माहितीच्या अधिकाराखालील एका अर्जामुळे उघडकीस आले की पॅसेंजर रेल्वेगाड्यांच्या उत्पन्नात दुसऱ्या तिमाहीत ११३% वाढ झालेली आहे.

(३) मा केंद्रीय जन माहिती आयोगाने यापूर्वी असे ग्राह्य धरले आहे की नमूद पीआरएन क्रमांकाशी संबंधित प्रवासाच्या स्थितीशी संबंधित माहिती माहितीचा अर्ज सादर करून मागता येईल. अशी माहिती निर्धारित वेळेत द्यावी लागेल.

(४) रेल्वेकडून प्रती मागण्याच्या शुल्काच्या संदर्भात अर्जदारांना मोठी रक्कम शुल्क म्हणून भरावी लागत असल्याने मोठा प्रश्न उभा राहिलेला आहे. रेल्वे बोर्डाच्या दिनांक १३.१२.२०११ रोजीच्या पत्रानुसार, अर्जदाराने आरक्षण तक्त्याची प्रत मिळवण्यासाठी १,रु ००० प्रति पृष्ठ या दराने शुल्क भरणे आवश्यक आहे, परंतु माहितीचा अधिकार (शुल्क आणि खर्च नियंत्रण) नियम, २००५ अन्वये केलेल्या तरतुदीनुसार हे शुल्क रु २ प्रति पृष्ठ एवढे आहे.

इन्स्टिट्यूट ऑफ कंपनी सेक्रेटरीने एका प्रमाणित उत्तरपत्रिकेच्या प्रतीसाठी रु ५०० आणि तपासणीसाठी रु ४५० एवढ्या शुल्काची मागणी केल्यामुळे अशाच स्वरूपाचा मुद्दा मा सर्वोच्च न्यायालयापुढे उपस्थित करण्यात आला होता. माहितीचा अधिकार नियमांनुसार केवळ रु २ प्रति पृष्ठ या दराने शुल्क आकारण्याची तरतूद आहे.

रेल्वकडून रेल्वेच्या पत्रानुसार मागणी केले जात असलेली शुल्काची मोठी रक्कम आणि माहितीचा अधिकार नियम, २००५ ची तरतूद या संदर्भातील मुद्दा केंद्रीय माहिती आयोगाने अपील निकाली काढताना अनुत्तरित ठेवला होता. सर्वोच्च न्यायालयाने उपरोक्त प्रलंबित प्रकरणात तो निकाली काढला.

दिनांक ११.. ९ रोजी मा सर्वोच्च न्यायालयाने असे ग्राह्य धरले की अर्जदाराला पर्याय निवडण्याचे स्वातंत्र्य आहे. अर्जदाराने इन्स्टिट्यूट ऑफ कंपनी सेक्रेटरीच्या मार्फत अर्ज सादर केल्यास त्याला इन्स्टिट्यूट ऑफ कंपनी सेक्रेटरीने निर्धारित केलेल्या दरानुसार शुल्क भरावे लागेल. त्याचवेळी माहितीचा अधिकार अधिनियमाखाली प्रती मागण्याचा पर्याय उपलब्ध आहे आणि अशा वेळी माहिती अधिकार नियम, २००५ द्वारे निर्धारित शुल्क लागू होईल. अशा प्रकारे, मा न्यायालयाने अर्जदाराने माहितीचा अधिकार अधिनियम वापरण्याचे ठरवल्यास शुल्कामध्ये दिलासा दिला.

*<u>माहितीच्या अधिकाराखालील नमुना अर्ज</u>*

**नोव्हेंबर ११, २०२१**

प्रति,

जन माहिती अधिकारी
भारतीय रेल्वे, मध्य रेल्वे
मुंबई, भारत

मा महोदय/ महोदया

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ६(१) अन्वये पुढील माहिती मागवण्यात येत आहे. कृपया पुढील माहिती पुरवावी:-

१. मुंबई रेल्वे स्थानकास जोडणाऱ्या रेल्वेगाड्यांची संख्या.

२. मुंबई रेल्वे स्थानकाच्या देखभाल आणि सुंदरीकरणाची कामे ज्यांच्याकडे सोपवली आहेत अशा ठेकेदारांची यादी.

३. मुंबई रेल्वे स्थानक आणि ठेकेदारांमधील सह्या केलेल्या कराराची प्रत.

४. मुंबई रेल्वे स्थानकाच्या सुंदरीकरणासाठी निर्धारित अंदाजपत्रकीय तरतूद.

५. मध्य विभागाकडे २०१९-२० या आर्थिक वर्षात जमा झालेले महसुली उत्पन्न.

आपला,
यक्षज्ञ

**अर्ज निकाली काढण्यापूर्वी कृपया या बाबी विचारात घ्याव्यात:-**

१. आवश्यक असल्यास, कृपया माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ५(३) अन्वये माहिती मिळवण्यास *‘रास्त सहकार्य करावे’*.

२. माहिती पूर्णतः किंवा अंशतः कोणत्याही अन्य विशिष्ठ खात्याकडे उपलब्ध असल्यास, कृपया कलम ६(३) अन्वये अर्ज, अंशतः किंवा पूर्णतः, संबंधित खात्याकडे अंतरित करावा.